



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १४९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.११ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## वाशिम हादरले! स्टेशन परिसरात महिलेवर आधी अत्याचार, मग क्रूर हत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, वाशिम :** वाशिम शहरातून एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील एका निर्जन स्थळी ५० वर्षीय महिलेवर पाशवी अत्याचार करून तिची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. मात्र, वाशिम पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या २४ तासांच्या आत नराधम आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.




**पाशवी कृत्य अन् पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न...**

मिळालेल्या माहितीनुसार, काल दुपारी वाशिम रेल्वे स्टेशन परिसरात एका अज्ञात महिलेचा छिन्नविच्छिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला. महिलेचे डोके दगडाने अशा प्रकारे ठेचले होते की ओळख पटवणेही कठीण झाले होते. घटनास्थळावर रक्ताचा सडा, दारूच्या बाटल्या, पॅन्टचा बेल्ट आणि खाण्याचे साहित्य विखुरलेले होते. यावरून नराधमाने आधी महिलेवर लैंगिक अत्याचार केला आणि त्यानंतर आपली ओळख लपवण्यासाठी व पुरावे नष्ट करण्यासाठी तिची क्रूरपणे हत्या केल्याचा संशय बळावला होता.

**अन् २४ तासांत आरोपीला बेड्या**

घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. पोलिसांसमोर पहिले आव्हान होते ते म्हणजे मृत महिलेची ओळख पटवणे. तांत्रिक तपास आणि चौकशीअंती ही महिला वाशिममधील पंचशील नगर भागातील असून ती शहरात भटकंती करायची, असे निष्पन्न झाले.

आरोपीचा माग काढण्यासाठी पोलिसांनी रेल्वे स्टेशन आणि परिसरातील तब्बल ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज पिंजून काढले. यामध्ये एक संशयित व्यक्ती पोलिसांच्या रडारवर आली. तपासात हा इसम अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील अडुळा बाजार येथील संतोष रामराव खंडारे असल्याचे समजले. पोलीस त्याच्या गावी पोहोचले, मात्र तो तिथे मिळून आला नाही. तो रेल्वेने अकोल्याला पसार झाल्याची शक्यता गृहीत धरून पोलिसांनी अकोला रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचला आणि त्याला शिताफीने अटक केली.

**आरोपीची कबुली, शवविच्छेदन अहवालाकडे लक्ष...**

पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी संतोष खंडारे याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. दारूच्या नशेत अत्याचार केला आणि त्यानंतर हत्या केली, असे त्याने मान्य केले आहे. या संदर्भात माहिती देताना जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आरोपीला अटक करण्यात आली असून सध्या मृतदेहाच्या शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरू आहे. बलात्कार झाला आहे की नाही, याचा अंतिम निष्कर्ष पोस्टमार्टम अहवालानंतरच अधिकृतपणे स्पष्ट होईल.

या कारवाईमुळे वाशिम पोलिसांचे कौतुक होत असले तरी, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भटकंती करणाऱ्या एका असहाय महिलेवर झालेल्या या अत्याचारामुळे जनमानसात तीव्र संताप व्यक्त होत आहे.




## महाराष्ट्रात हुडहुडी! तापमानाचा पारा घसरला
### पुढील दोन दिवस कडाक्याची थंडी, हवामान खात्याचा इशारा



**शहरातील किमान तापमान (अंश सेल्सिअसमध्ये)**

| | |
|---|---|
| मगरपट्टा | १५.३ |
| चिंचवड | १४.२ |
| हडपसर | ११.६ |
| आंबेगाव | १० |
| तळेगाव | ९.८ |
| शिवाजीनगर | ८.४ |
| पाषाण | ८.३ |
| एनडीए | ६.९ |
| हवेली | ६.९ |

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, पुणे :** उत्तरेकडील वाऱ्यांना अनुकूल वातावरण मिळाल्याने महाराष्ट्रातील थंडी पुन्हा वाढली आहे. पुण्यात शुक्रवारी पहाटे ८.४ अंश सेल्सिअस किमान तामानाची नोंद झाली, तर एनडीए आणि हवेली भागात ६.९ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. पहाटे कडाक्याची थंडी होती, शिवाय दिवसभरही हवेत गारवा राहिला. पुढील दोन दिवस हेच चित्र कायम राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) व्यक्त केला आहे.

पुण्यात गेल्या आठवड्यात थंडीचा जोर ओसरला होता. कमाल आणि किमान तापमानात सरासरीपेक्षा जास्त वाढ झाली होती. दोन दिवस ढगाळ वातावरण होते. कडाक्याच्या थंडीने विश्रांती घेतल्याने पुणेकरांनी सुस्कारा सोडला. मात्र, बुधवारी तापमानाचा पारा दहा अंशाच्या खाली आला. गुरुवारीदेखील तापमानात आणखी घट नोंदविण्यात आली. सकाळी थंडीमुळे पुणेकरांना हुडहुडी भरली. ऊन पडल्यावर थंडीचा जोर ओसरेल, अशी चर्चा होती. पण दिवसभर हवेत गारवा कायम राहिल्याने नागरिक स्वेटर घालून फिरताना दिसले. दिवसभरात कमाल २७.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. नाशिकमध्येही हुडडी कायम असून निफाडमध्ये थंडीने एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

**काश्मीरमध्ये थंडीचा प्रकोप**

**श्रीनगर :** काश्मीर खोऱ्यात शीतलहरीचा प्रकोप वाढत असून, तापमान खाली घसरले आहे. श्रीनगरमध्ये शुक्रवारी रात्री मोसमातली सर्वाधिक थंडीची नोंद झाली. यामुळे दल तलावाचा आतील भागही गोठल्याचे पाहायला मिळाले. श्रीनगरमध्ये तापमान ४.१ अंशांपेक्षाही कमी नोंदले गेले. पहलगाममध्ये तापमान ७ अंशांपेक्षाही कमी होते. कुपवाडात ५.८, सोनमर्गमध्ये ५.४ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान घसरले.

## बुलडाणा जिल्ह्यात खळबळ !
### रिक्षाचालकाला क्रूरपणे संपवलं, बॉडी रस्त्याच्या कडेला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यात आज सकाळीच एका रिक्षाचालकाचा मृतदेह रस्त्याच्या कडेला आढळून आल्यानंतर जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे. पोलीस प्रशासन देखील कसून चौकशी करत असून अद्याप या प्रकरणाचा उलगडा झालेला नाही. ही हत्या की आत्महत्या आहे? याबाबत अजूनही सर्व काही गुलदस्त्यात आहे.



**•बुलढाण्यात घडलं तरी काय?**

बुलढाण्यातील मलकापूर तालुक्यातील शिवनी ते तालसवाडा रोड परिसरात एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यात वाऱ्यासारखी पसरली. अमोल भाऊराव भवरे (वय ३५, रा. धरणगाव) असं मृतकाचं नाव असून त्याची गळा आवळून हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. हत्या केल्यानंतर मृतदेह शिवनी तालसवाडा रस्त्यावर बाजूला फेकून देण्यात आल्याने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.

**•हत्या की आत्महत्या?**

मृतक अमोल भवरे हा व्यवसायाने रिक्षाचालक असल्याची माहिती समोर आली आहे. आज सकाळच्या सुमारास रस्त्याच्या कडेला संशयास्पद अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. प्राथमिक तपासात गळा आवळून हत्या करण्यात आल्याने ही हत्याच असल्याचा संशय अधिकच बळावला आहे. मात्र, नेमकी ही हत्या कोणी व कोणत्या कारणातून केली? याकरिता पोलीस तपास करत आहेत. या घटनेची चौकशी करत असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व अमोल शेवटी कुणाशी बोलला होता? त्याचं लोकेशन काय होतं? तसेच वैयक्तिक किंवा व्यावसायिक वाद याच्या अनुषंगाने तपास सुरू आहे. या घटनेमुळे रिक्षाचालक व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून लवकरच आरोपींचा शोध घेण्यात येईल असं सांगण्यात आलं आहे.

**•बुलढाणा हळहळलं !**


बुलढाणा जिल्ह्यात एकापाठोपाठ एक जणू काही अपघाताची स्पर्धाच लागली आहे का, ही विचारण्याची वेळ आली आहे. आज ५ जानेवारी रोजी साधारणत: संध्याकाळी चार ते पाच वाजेच्या दरम्यान दुपारी बुलढाण्यात एक मोठी दुर्घटना घडली. ती देखील दुचाकी आणि एसटी बसमध्ये, हा अपघात इतका भयानक होता की सर्व काही स्तब्ध होऊन गेले. मुख्य म्हणजे या अपघातात मृतांच्या शरीराचे अक्षरश: तुकडे झाले आहेत. या अपघाताने बुलढाणा हादरुन गेले आहे.

## ५ हजाराची लाच मागितल्याप्रकरणी तलाठ्यावर एसीबीची कारवाई

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१०, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील मौजे कांदळे येथील सर्व्हे नं.८९ या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांची नावे नोंद करण्यासाठी ५,००० रुपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी आरोपी लोकसेवक महादेव सिताराम धुमाळ (वय ३४) यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अॅन्टी करप्शन ब्युरो) कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

तक्रारदार यांनी दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी लाप्रवि, अलिबाग, जिल्हा रायगड येथे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवकाने स्वतःसाठी तसेच मंडळ अधिकाऱ्यासाठी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याचे अॅन्टी करप्शन ब्युरोने नमूद केले आहे. पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत पडताळणी करताना दिनांक २२/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०६ ते ०६.२३ या वेळेत मोबाईल फोनद्वारे, तसेच ०७.०३ ते ०७.४२ या वेळेत उपविभागीय अधिकारी, पेण कार्यालयाबाहेर प्रत्यक्ष भेटीत ५,००० रुपयांची लाच मागितल्याचे व ती



स्वीकारण्यास मान्यता दिल्याचे पंचनामा व पुराव्यांद्वारे निष्पन्न झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

या प्रकरणाची कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे व सुहास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उप अधीक्षक सरिता आय.एस.भोसले (अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड-अलिबाग) आणि पोलीस निरीक्षक निशांत धनवडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक विनोद जाधव, पोह महेश पाटील, परम ठाकुर, सुमित पाटील तसेच पोह सागर पाटील यांचा समावेश होता.

# लालबहादुर शास्त्री यांचा साधेपणा !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०



सध्या राज्यातील अनेक प्रमुख जिल्ह्यांम ध्ये महापालिका निवडणुकांची धूम आहे. निवडणुकीत उभे राहिलेले सर्वच उमेदवार जिंकून येण्याच्या आशेने कार्यकर्त्यांवर, प्रचाराच्या साधनांवर, सामाजिक माध्यमांवर पाण्यासारखा पैसा खर्च करत आहेत. हे पाहिल्यावर त्यांची ही तळमळ नक्की लोकसेवेसाठी आहे की निवडून आल्यावर सत्तेचा मलिदा लाटण्यासाठी, असा प्रश्न कोणालाही पडावा. देशाच्या स्वातंत्र्यानंतर निवडणूक प्रक्रिया, उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी आवश्यक पात्रता, प्रचाराच्या पद्धती, निवडून येण्यासाठी खेळले जाणारे डावपेच यांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले. यंदाच्या निवडणुकीत काही गोष्टी नव्याने घडल्या.

विरोधात उभे राहिलेल्या काही उमेदवारांना कोट्यवधी रुपये देऊन खरेदी केले गेले, तर काहींना धमकावून उमेदवारी मागे घेण्याचे प्रकार घडले. बिनविरोध निवडणुकीचे नवे फॅड यंदा पाहायला मिळाले. आजच्या घडीला निवडणूक म्हटली की सर्व पैशांचा खेळ झाला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीला आपल्याला जे राज्यकर्ते लाभले ते मात्र स्वार्थी नव्हते. ना त्यांना पदाचा लोभ होता ना सत्तेची हाव ! त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि साधेपणाची उदाहरणे आजच्या स्वार्थी राज्यकर्त्यांनी अभ्यासण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. या देशप्रेमी राजकीय नेत्यांपैकी एक असलेले लालबहादुर शास्त्री यांचा ११ जानेवारी हा स्मृतिदिन.

लालबहादुर शास्त्री म्हणजे साधेपणा आणि महानतेची प्रतिकृती होते. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग प्रेरणादायी आहेत. ते देशाचे पंतप्रधान असतानाची गोष्ट आहे. एके दिवशी ते कापड गिरणी पाहण्यासाठी गेले. त्यांच्याबरोबर गिरणीचा मालक, उच्च अधिकारी व इतर महत्त्वाचे लोक होते. गिरणी पाहिल्यानंतर शास्त्रीजी गिरणीच्या गोदामात गेल्यानंतर त्यांनी साड्या दाखवायला सांगितले. गिरणी मालक आणि अधिकार्याने एकापेक्षा एक सुंदर साड्या त्यांना दाखवल्या. शास्त्रीजी साड्या पाहून म्हणाले,' साड्या तर खूप सुंदर आहेत, यांची किंमत काय आहे?' ' ही साडी ८०० रूपयांची आहे आणि हिची किंमत एक हजार रुपये आहे,' गिरणी मालकाने सांगितले. ही तर खूप महाग आहे, मला कमी किमतीच्या साड्या दाखवा, शास्त्रीजी म्हणाले. ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट होती की ही घटना १९६५ ची होती, यावेळी एक हजार रुपयांची किंमत खूप होती. 'बरं, ही पाहा. ही साडी पाचशे रुपयांची आहे आणि ही चारशे रुपयांची,' गिरणी मालक दुसर्या साड्या दाखवत म्हणाला. 'अरे बाबा, यादेखील खूप महाग आहेत. माझ्यासारख्या गरीबासाठी कमी किमतीच्या साड्या दाखवा, ज्या मी खरेदी करू शकेल,' शास्त्रीजी म्हणाले. 'वा सरकार, आपण तर आमचे पंतप्रधान आहात, तुम्हाला गरीब कसे म्हणता येईल? आम्ही तर या साड्या तुम्हाला भेट देत आहोत,' गिरणी मालक बोलला. नाही बाबा, मी भेट घेऊ शकत नाही', शास्त्रीजी म्हणाले. यावर तो गिरणी मालक अधिकाराने म्हणाला की, 'आम्ही आमच्या पंतप्रधानांना भेट देणे, हा आमचा अधिकार आहे.' ' हो, मी पंतप्रधान आहे,' शास्त्रीजी शांतपणे म्हणाले.' परंतु, याचा अर्थ असा नाही की ज्या वस्तू मी खरेदी करू शकत नाही त्या वस्तू मी भेट म्हणून स्वीकारू आणि आपल्या पत्नीला देऊ. मी पंतप्रधान असलो तरी आहे गरीबच ना ! तुम्ही मला स्वस्त साड्याच दाखवा. मी ऐपतीप्रमाणेच साडी खरेदी करेन.' गिरणी मालकाच्या सार्या विनवण्या व्यर्थ गेल्या. देशाच्या पंतप्रधानांनी स्वस्त भावाच्या साड्याच खरेदी केल्या. शास्त्रीजी एवढे महान होते की मोह त्यांना स्पर्शही करू शकत नव्हता.

शास्त्रीजी गृहमंत्री असताना तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना काश्मीर येथील बैठकीस जाण्यास सांगितले त्यावर त्यांनी त्यांच्याकडे थंड प्रदेशात घालायचे गरम कपडे नसल्याने जाण्यास अनिच्छा दर्शवली, त्यानंतर नेहरू यांनी स्वतःचा कोट शास्त्रीजींनी देऊ केला. पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरही शास्त्रीजींकडे त्यांच्या मालकीची चारचाकी गाडी नव्हती. या पदावर असतानाच त्यांनी गाडी खरेदी करण्यासाठी कर्ज काढले. या कर्जाचे हप्ते त्यांनी पंतप्रधान काळात आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने फेडले. याउलट आजच्या स्थितीचा विचार केल्यास साध्या महापालिकेच्या निवडणुकीत विजयी होऊन नगरसेवक बनलेल्याकडे पाच वर्षांत गाडी बंगल्यासह अनेक सुखसुविधा पायाशी लोळण घेऊ लागतात. पुढच्या किमान दोन पिढ्या बसून खातील एव्हढा बक्कळ पैसा तिजोरीत जमा होतो. हा भेद नेमके काय दर्शवतो ? आजमितीला पक्षातून अधिकृत तिकीट मिळण्यासाठी उमेदवाराला पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी आर्थिक हितसंबंध जोपासावे लागतात.

तिकीट मिळाल्यावर प्रचारासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात त्यामुळे निवडून आल्यानंतर खर्च केलेला पैसा वसूल करण्यात आणि भविष्यासाठी आपली आणि कुटुंबीयांची व्यवस्था करण्यात काही वर्षे निघून जातात. एकूणच ज्याच्याकडे बक्कळ पैसा आहे असाच उमेदवार निवडणूक लढवू शकतो आणि जिंकून येऊ शकतो हे समीकरण निश्चित झाले आहे. त्यामुळे शास्त्रीजींसारखे साधे आणि प्रामाणिक लोकनेते येणाऱ्या पिढीला केवळ इतिहासातच वाचायला मिळतील हे निश्चित !

## आजच्या काळात ड्रायव्हिंग शाप की वरदान?

दळणवळण ही साऱ्या जगाची सर्वात मोठी समस्या आहे. दररोज असंख्य प्रवासी किमान एका वाहनाने प्रवास करत असतात. श्रीमंत लोक विमानाने आणि अतिशय महागड्या व अलिशान गाडीने ऐटीत प्रवास करतात, मध्यमवर्गीय लोक शक्य असेल तर स्वतःच्या वाहनाने प्रवास करतात. आणि गरीब लोक बसने व रेल्वेने गर्दीत घुसून दाटीवाटीने उभा राहून प्रवास करतात.प्रवासाच्या या धावपळीत व दगदगीत प्रवास सुखरुप होईल किंवा नाही याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही.

या सगळ्यांचा प्रवास घडवून आणणारे व दळणवळणाच्या माध्यमातून साऱ्या जगाला जोडण्याचे काम ड्रायव्हर लोक करत असतात.जगात जेवढे लोक ड्रायव्हर आहेत त्यांना परफेक्ट ड्रायव्हिंग येतेच असे नाही.खेडे गावात शेतातले ट्रॅक्टर वेडेवाकडे चालवणाऱ्या शेंबड्या पोराला सुध्दा ड्रायव्हर म्हटले जाते.


ड्रायव्हिंग ही एक कला आहे. परफेक्ट ड्रायव्हिंग त्याहून अधिक अलौकिक कला आहे. ही कला कोणालाही जमत नाही.ड्रायव्हिंग करताना थोडाही हलगर्जीपणा चालत नाही.नजर हटी दुर्घटना घटी,मनावर ब्रेक उत्तम ब्रेक,वाहने सावकाश चालवा,अति घाई मृत्यू जवळ येई अशी महत्त्वपूर्ण व ड्रायव्हर व्यक्तीला नेहमी सावध करणारी वाक्ये रस्त्यावरील फलकावर लिहिलेली असतात. काही निष्णात ड्रायव्हर या सुचनांचे तंतोतंत पालन करतात.फार थोडे ड्रायव्हर निर्व्यसनी असतात.वाहन चालवताना ते स्थिर असतात,घाई गडबड करत नाहीत आणि वेगावर नियंत्रण ठेवतात.असे ड्रायव्हर कमी आहेत जे कधीच घाईघाईने दुसऱ्या वाहनांना ओव्हरटेक करून पुढे जात नाहीत.हे ड्रायव्हर लोक आपल्यामुळे कोणाचा अपघात होणार नाही,जीव संकटात सापडणार नाही याची दक्षता घेतात.वेगवेगळ्या वाहनाने प्रवास करताना अनेक ड्रायव्हर व्यक्तीशी आपला संबंध येतो.त्यापैकी काही निष्णात ड्रायव्हर असतात,काही चांगले ड्रायव्हर असतात आणि काही कामचलाऊ ड्रायव्हर असतात.

ज्या ड्रायव्हर व्यक्तीला परफेक्ट ड्रायव्हिंग येते त्या व्यक्तीचे कौतुक करावे तेवढे कमीच असते.ह्या व्यक्ती बेसावध होऊन वाहन कधीच चालवत नाहीत.अशी ड्रायव्हर व्यक्ती दुसऱ्यांच्या वाहनातून प्रवास करू इच्छित असेल तर त्याला रिकामे बसून प्रवास करू दिला जात नाही.त्या वाहनाचा मालक आपल्या वाहनाची चावी त्या परफेक्ट ड्रायव्हरला देतो व ड्रायव्हिंग करायची विनंती करतो.एका गाडीचा किंवा कारचा मालक परफेक्ट ड्रायव्हरला आपले वाहन देताना थोडेही कचरत नाही.जे ड्रायव्हर स्वतःचे व दुसऱ्यांचे वाहन अतिशय काळजीपूर्वक चालवतात ,आपल्याम ुळे अपघात होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतात. अशा गुणी व निष्णात ड्रायव्हरची संख्या वाढणे काळाची गरज बनली आहे.कारण आजकाल बहुतांश ड्रायव्हर अनियंत्रित वेगाने व निष्काळजीपणे वाहने चालवतात.काही ड्रायव्हर तर नशापान करून वाहने चालवतात. अशा ड्रायव्हर लोकांमुळे अपघात होतात आणि निष्पाप माणसांचे बळी जातात.असे ड्रायव्हर लोक दळणवळण क्षेत्रासाठी शाप ठरतात.म्हणून अशा ड्रायव्हर लोकांनी वाहने चालवून इतरांना संकटात ढकलू नये. माझे अनेक मित्र परफेक्ट ड्रायव्हिंग करतात.त्यांच्या या कलेचे कौतुक करावे तेवढे कमीच. दत्तात्रय मोहिते,संदिप डोंगरे, सदाशिव काडवदे,एकनाथ पलमटे, भाऊसाहेब माने,विलास आगलावे, भरत जाधव,मुस्तफा शेख,विजय वाघवसे व अंकुश आढे या मित्रांसोबत प्रवास करताना प्रवास सुखकर होतो.यांच्या ड्रायव्हिंग कलेचा मला हेवा वाटतो.यांची उच्च दर्जाची ड्रायव्हिंग कला इतरांसाठी नक्कीच वरदान आहे.

ड्रायव्हर बेशिस्त,व्यसनी व विचलित झालेला असेल तर त्याची ड्रायव्हिंग नेहमीच अभिषाप ठरते. याउलट जे ड्रायव्हर नेहमीच दक्ष राहून,चौफेर नजर ठेवून आणि निर्विघ्नपणे ड्रायव्हिंग करतात ते ड्रायव्हर आपल्या सर्वांसाठी वरदान ठरतात.चांगल्या ड्रायव्हर व्यक्तींमुळे हे जग निरंतर प्रवास करीत आहे आणि भविष्यात सुखरूप प्रवास करत राहणार आहे.

- बबन दामोदर गुळवे

# खरा कोविड योद्धा.. मा.राजेशजी (भैय्या) टोपे..!!





ऐरवी स्थानिक राजकीय टिकेला कधीच प्रति उत्तर न देण्याचा आदरणीय राजेश (भैय्या) टोपे साहेब यांचा स्वभाव परंतु मागिल काळात कोरोना सारख्या गंभीर शत्रु सोबत राजेश भैय्यानां लढताना आणि भिडताना पाहीलय. खरच भैय्यासाहेब तुमचा हा लढवय्या बाणा पाहुन आमचा ऊर भरून येतो....!!

मतदारसंघात, तालुक्यात, किंवा जिल्ह्यात कुठलाही कार्यक्रम असला की चौकटीत फक्त म हत्त्वाच्या मुद्यानां स्पर्श करत भाषण करत असे. आमच्या सारख्या अनेक युवा कार्यकर्त्यानां ही वाटायच की खरचं भैय्यासाहेब खुपच साधे आहेत. सतरा वर्षे मंत्री राहिलेले भैय्यासाहेब यांनी कधीच अंगावर कोट नाही चढवला की कधी झग्याचा ड्रेस घातला नाही, गाडीतुन उतरले की साहेब भराभर चालत कधी पळत सुटतात, आम्ही अजुन तरी भैय्यासाहेबांनी हाताची घडी घालुन ऐटबाज चालीत चालताना साहेबानां कधी पाहील नाही. आम्हाला ही वाटायच की इतर नेत्यासारंख भैय्यासाहेबांनी ही गाड्याचां ताफा घेत कोल्हापुरी घालत धुराळा उडवत यावं. अधिकार्यानां मंत्रीपदाची पॉवर दाखवत शिवराळ भाषेत बोलाव परंतु हा विचार भैय्यासाहेबांच्या मनाला कधीच शिवला नाही, साध्यातला साधा ही अधिकारी/कर्मचारी असला की त्याला साहेब म्हणत मी राजेश टोपे बोलतोय असे सांगत मन जिंकून घेत असत.

सतत लोकांत राहुन स्व.अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या पावलावर पाऊल ठेवत अहोरात्र जनतेच्या कल्याणासाठी,सेवेसाठी विकासकामे करूनही ही २०१९ च्या विधानसभा निवडणुकित निसटता विजय भैय्यासाहेबानां मिळाला पण विजय हा सत्याचाच झाला पक्ष, जात - पात, धर्म, समाज, श्रीमंत गरीब, असा भेद भाव न करता, उदा. गळ्यात कुणी विरोधी पक्षाचा रुमाल घालुन ही कधी आला तर त्यानीं कधी कुणाच काम अडवलं नाही. परीणामी भैय्यासाहेबांचा गोड स्वभावाचा फायदा घेत पक्षातील काही गद्दारांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकित भैय्या साहेबांच्या विरोधात काम केले... तरीही भैय्या साहेबांनी धनदांडग्या उमेदवाराला धुळ चारत निवडुन येऊन सलग पाचव्यांदा आमदार झाले. पक्ष नेतृत्वाने विरोधी पक्षात बसण्याची भुमिका घेतली. नंतर सत्तेचे फासे पलटले ज्या शिवसेना पक्षाच्या नावावर विरोधकानीं भैय्यासाहेबानां आव्हान दिले होते त्याच शिवसेना पक्षप्रमुखांच्या नेतृत्वात भैय्यासाहेब कॅबिनेट मंत्री झाले. खातं मिळाल आरोग्य दोन वर्षापासुन महाभयानक करोना साथ रोग आला होता. आरोग्यमंत्री मा.श्री.राजेशजी (भैय्या) टोपे साहेबांनी दुहेरी आव्हान स्विकारत भैय्या साहेबानीं स्वत:च्या आईचे निधन झाले असतांनी ३ दिवसांत पूर्ण विधी आटपुन परत पुन्हा राज्यातील जनतेच्या सेवेसाठी रात्रंदिवस आपल्या व कुटुंबाच्या आरोग्याची तमा न बाळगता तगडी फिल्डींग लावुन जबरदस्त नियोजन करून करोणा सारख्या महाभंयकर साथ रोगावर विजय मिळवला. या खात्याचा इतिहास पाहीला तर हे खातं शापीत समजल जातं ज्यानीं हे खात सांभाळल त्यांना मागील काळात किचन कल्लाकार कार्यक्रमात इगझ चे मा.खासदार डॉ.सुजय विखे तसेच देशभरातील सर्वच क्षेत्रातील मोठं मोठ्या व्यक्तींनी सांगितल्या प्रमाणे आरोग्य खात्याला आतापर्यंत न्याय देऊन राज्यातच नव्हे, देशात नव्हे, तर जगात भैय्यासाहेबांचे नाव झाले.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भैय्यासाहेबांच्या गोड स्वभावाचा फायदा घेत पक्षातील काही गद्दारांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकी प्रमाणेच भैय्या साहेबांच्या विरोधात काम करून जातीवाद करत धनदांडग्या उम ेदवारांनी मतदार संघात अमाप पैशाच्या जोरावर मतदारांना प्रभावित करून व भैय्यासाहेब यांच्या तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा सोबत पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हांवर मुद्दाम हुन उमेदवार उभा केला त्यामुळे मतदारांना मध्ये गोंधळ निर्माण होऊन पिपाणी ने भैय्यासाहेबांची बरीचशी मते खाल्ली व भैय्यासाहेबांचा किरकोळ मतांनी निसटता पराभव झाला.भैय्यासाहेबाच्या पराभवाकरीता सर्व विरोधकांनी स्वाभिमान, पक्ष, नितीमत्ता, फोडाफोडी, जातीयवाद, हेवेदावे, नाती - गोती, अमाप पैसा, दबावतंत्र, दादागिरी करून सर्वजण म्हणजेच होशे, नवशे, गवशे एकत्र येऊन यांनी खुप मोठ - मोठी षडयंत्र केली, पण तरीही व एकटे भैय्यासाहेब त्या सर्व विरोधकांना पुरून उरले. व शेवटपर्यंत तगडी फाईट देत विरोधकांना घाम फोडला.

असो तरीही भैय्यासाहेबांनी न डगमगता पराभव पचवून लगेचच दुसऱ्या दिवशीपासून परत मतदार संघातील/तालुक्यातील/ जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नाकरता, समस्या करता, सुख दुःखात सहभागी होऊन आपल्या पायाला भिंगरी लावून आजही भैय्यासाहेब मतदार संघातील मतदारांकरीता / जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र मतदार संघात रात्रंदिवस सेवेसाठी हजर आहे.

आजही भैय्यासाहेबांचा तोच जोश, तोच दरारा, तोच जनतेप्रती नम्रपणा पहायला मिळतो. अशा या खऱ्या कोविड युद्धाचा आरोग्य मंत्री असताना शिपाई होण्याचे भाग्य मला लाभलं साहेब वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..!!

ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.
मु.पो.मासा बेलेवाडी.
कागल-कोल्हापूर.

## उसने वीर

उसने आणू पुस्तके
करतोयं कोण परत
ग्रंथसंपदा चोरलेली
आयुष्यां नाही पुरत

आठवत नसेआम्ही
कधी घेतली विकत
पुस्तक खर्चा साठी
नसे आर्थिक ताकद

परत मागायं पुस्तक
कोणकरणारं हिंमत
अद्वातद्वा बोलून मी
करतोत्याची किंमत

देणार ना जो पुस्तक
काढतो पुरती दानत
चौर्यकर्म प्रिय भलते
लागते केवढीमेहनत

गच्चभरलीअलमारी
संपदाजमेअनगिनत
छंद छान जोपासला
लोकांना बसेसुनवत

गर्दी उसळते तिकडे
ग्रंथ असतात वाटत
भीकमागून आणतो
काहीकाही न वाटत

पर्वणी महान उत्सव
पुस्तके मिळे मोफत
कितीजमवू खजिना
हाव मुळीचं न संपत

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## एपीएमसी जवळ पकडली १६ लाख १६ हजार रोकड



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेने शहरात प्रवेशाच्या तसेच मुख्य विविध ९ ठिकाणी दिवसाच्या तिन्ही सत्रांमध्ये २४ तासात २७ स्थिर संनिरीक्षण पथके (एसएसटी टीम) स्थापन केलेली आहेत. या पथकांमार्फत वाहने व इतर बाबींवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येत आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, आचारसंहिता कक्षाचे मुख्य सनियंत्रण अधिकारी सुनील पवार यांचे मार्गदर्शनाखाली, दि.०९ जानेवारी २०२६ रोजी, दुपारी १२.३० वा. दरम्यान एपीएमसी मार्केट जवळील चेक पोस्टवर आचार संहिता कक्षाचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ.अमोल पालवे व परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तुषार दौंडकर तसेच प्रशासकीय अधिकारी संजीव पवार यांच्या नियंत्रणाखाली एकूण रू. १६,१६,०००/- इतक्या किंमतीची रोकड पकडण्यात आली आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

## ३४ व्या नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत तन्मय पाटील याला ब्राँझ पदक

### कॅनडा येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ गेम्ससाठी राष्ट्रीय संघात निवड



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१०, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील बेलवडे गावातील सामाजिक कार्यकर्ते मोहन रामशेठ पाटील यांचा मुलगा तन्मय पाटील याने फरीदाबाद (हरियाणा) येथे झालेल्या ३४ व्या नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६ च्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ पदक पटकावून तिसरा क्रमांक मिळविल्याने त्याची कॅनडा येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ गेम्ससाठी राष्ट्रीय संघात निवड करण्यात आली आहे. तन्मय पाटील याला लहानपणापासूनच पॉवरलिफ्टिंग ची आवड असून आजवर त्यांनी अनेक स्पर्धेमध्ये भाग घेत पारितोषिक मिळवली आहेत. त्यांच्या या यशाबद्दल बेलवडे गावासह तालुक्याचे नाव उज्वल झाले असून तन्मय पाटील याच्या यशाबद्दल राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, नगराध्यक्षा प्रितम पाटील, नवनिर्वाचित नगरसेवक अभिराज कडू, प्रसिद्ध उद्योजक प्रविण प्रतापराव भोसले, मंगेश दळवी, सचिन डाबी, सरपंच हरीश पाटील, भाजप युवा जिल्हा चिटणीस प्रवीण पाटील, माजी उपसभापती बाळाराम पाटील, पोलीस पाटील किसन पाटील, खोपोली नगर परिषदचे माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, ग्रामपंचायत सदस्या अश्विनी पाटील आदिंसह गावातील ग्रामस्थ महिला मंडळांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## ठाणे जिल्हा (ग्रामीण) चे माजी अध्यक्ष कॉंग्रेस पक्ष सोडणार?

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१०, शहापूर (ठाणे) :** नगरपंचायत, नगरपालिका निवडणूकी नंतर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी झालेल्या मतभेदानंतर ठाणे जिल्हा (ग्रामीण) कॉंग्रेस च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला एक नेता आता आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह पक्ष सोडण्याच्या तयारीत आहे. आपल्या खाजगी फाऊंडेशन च्या माध्यमातून त्यांनी कॉंग्रेस पक्षाला जिल्हात पोहचविण्यात भूमिका बजावली होती. सध्या त्यांनी 'वेट अॅण्ड वॉच' ची भुमिका घेतली असुन कॉंग्रेस सोडल्यानंतर कोणत्या पक्षात जायचे याबाबत ते महिना अखेर पर्यंत निर्णय घेणार आहेत. या बाबत भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण बदलापूर अंबरनाथ व पालघर जिल्ह्यातील वाडा या भागातील माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, माजी सभापती, माजी उपसभापती, आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सहकार क्षेत्रातील आजी-माजी पदाधिकारी, विविध पक्षातील कार्यकर्ते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, यांच्यासह ५ हजार पेक्षा जास्त कार्यकर्त्यांना घेऊन सोबत त्यांचा नवीन पक्ष प्रवेश होणार आहे. मात्र ते कोणत्या पक्षात जाणार हे पक्ष प्रवेशाच्या दोन दिवस अगोदर पत्रकारांना कळवणार असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले आहे.

## मतदान जनजागृती नवी मुंबईकर तृतीयपंथी नागरिकांचा ही पुढाकार




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** मतदान हा संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला समान हक्क असून आम्ही मतदान करणार आहोत, तुम्हीही मतदान करा असा संदेश नवी मुंबईतील तृतीयपंथी नागरिकांनी मार्केट, चौक व वर्दळीची ठिकाणे येथे प्रसारित केला. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत १०० टक्के मतदान व्हावे. याकरिता स्वीप उपक्रमांतर्गत व्यापक जनजागृती करण्यात येत असून यामध्ये सर्व समाजघटकांचा उत्साही सहभाग लाभत आहे.

विशेषत्वाने शाळा - महाविद्यालयांमध्ये मतदान जागरुकता अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले जात आहे. त्याचप्रमाणे महिला मंडळे, विविध स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघटना यांच्यामार्फतही यावर्षी पहिल्यांदाच होणाऱ्या बहुसदस्यीय मतदान प्रक्रियेत कसे मतदान करावयाचे याविषयी माहिती प्रसारित केली जात आहे. यामध्ये आता तृतीयपंथी नागरिकांनीही पुढाकार घेत वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, अरेंजा कॉर्नर, से.९ मार्केट याठिकाणी मतदान जनजागृतीत प्रत्यक्ष सहभाग घेतला असून मतदानाविषयीची माहितीपत्रके वितरित करुन मतदान करण्याचे आवाहन केले आहे. तृतीयपंथीय नागरिकांनी ही मतदान जनजागृती मोहीमेत सहभाग घेतल्याने याद्वारे नवी मुंबईच्या सर्वसमावेशक संस्कृतीचे दर्शन घडत आहे.

## राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत ही 'ज्ञानमाता झरी' शाळेच्या खेळाडूंनी आपली चुणूक दाखवली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, तलासरी (पालघर) :** महाराष्ट्र महाराष्ट्र शासनाचा आदिवासी विकास विभागातील शासकीय व अनुदानित आश्रम शाळांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दिनांक ५ ते ७ जानेवारी रोजी हनुमान प्रसारक व्यायाम मंडळ, अमरावती येथे संपन्न झाल्या. ठाणे विभागाचे नेतृत्व करताना अतितटीच्या व चुरशीच्या झालेल्या विविध स्पर्धांमध्ये ज्ञानमाता झरी आश्रम शाळेतील २१ खेळाडूंनी आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवून प्रशंसा मिळविली.

१९ वर्षे वयोगटात किरण नाईक यांनी १०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक पटकावला. ४*१०० रिले प्रकारात सहभागी असलेले किरण नाईक, अतुल धांगडा, राहुल दळवी व स्नेहल कोंढारी यांनी ठाणे विभागाला सुवर्णपदक पटकावून दिले. आरती वरखंडे हिने ३००० मीटर धावणे प्रकारात ब्रॉझ पदक मिळविले.

ठाणे विभागाच्या कबड्डी संघात असलेल्या अमोल अंधेर व वैभव वावरे यांनी तृतीय क्रमांक मिळवताना उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षवयोगटातील कबड्डी संघात असलेल्या प्रणव वरखंडे प्रितेश वढाणे व अनवेश वळवी यांनी ठाणे विभागाला विजेतपद मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. ४*१०० रिले प्रकारात सहभागी असलेल्या रोशन बारगा, तेजस गवळी, राहुल धांगडा यांनी सिल्वर पदक मिळवले. १४ वर्ष वयोगटात रोशन बारगा यांने ६०० मी. धावण्याच्या स्पर्धेत ब्रॉझ पदक मिळवले.

१७ वर्ष मुलींच्या कबड्डी संघात असलेल्या संस्कृती उराडे हिने ठाणे विभागाला उपविजेतेपद पटकावून देण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. विद्यालयाच्या प्राचार्या सि. बस्तियाना फर्नांडिस यांचे मार्गदर्शन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेली मेहनत, ज्ञानमाता सदन संस्थेचे संचालक फा. निलम लोपीस व शाळा संचालक फा.सॅबी कोरिया यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे व पालकांच्या सर्वतोपरी सहकार्यामुळेच विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या क्रीडा यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## मतदाराची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणार - आयुक्त अकुनुरी नरेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. मागील २०१७ मधील निवडणुकीत ५२.५६ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जोरकसपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आयुक्त अकुनुरी नरेश यांनी पत्रपरिषदेत दिली. ते म्हणाले, या स्वीप अभियानांतर्गत प्रयत्न करण्यात येत आहे. सर्व नागरिकांनी मतदान करुन आपला मतदानाचा अधिकार बजावावा व देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये आपला सहभाग नोंदवावा. मनपा निवडणुकीत १७ प्रभाग असून, निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या ६६ आहे.

प्रभाग क्रमांक १ ते १५ मध्ये ४, तर प्रभाग क्रमांक १६ व १७ मध्ये ३ सदस्य आहे. एकूण मतदान केंद्रांची संख्या ३५५ आहे आहे. १ लाख ४९ हजार ६०९ पुरुष, १ लाख ५० हजार ३५४ महिला, तर इतर ३१ असे एकूण २ लाख ९९ हजार ९९४ मतदार आहेत. निवडणुकीत २ हजार २०७ कर्मचारी कार्यरत राहणार आहे. ७२० कंट्रोल युनिट असून, बॅलेट युनिटची संख्या १ हजार ५५० राहणार आहे. निवडणूक प्रचारासाठी आवश्यक परवानग्या सुलभ, पारदर्शक व वेळेत मिळाव्यात यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या 'एक खिडकी कक्षा' द्वारे ८ जानेवारीपर्यंत १ हजार ७ अर्ज मंजूर, तर ३२ अर्ज नामंजूर करण्यात आले. तर १६६ अर्ज परवानगी प्रक्रियेमध्ये आहे. आचारसंहिता कक्षामार्फत १ गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

आचारसंहिता अंमलबजावणीसाठी १६ स्थायी निगरानी पथक, १० व्हिडीओ देखरेख पथक, १० फिरते पथक व ५ व्हिडीओ परीक्षण पथक असे एकूण ४१ पथके कार्यान्वित आहे.

निवडणूक खर्च तपासणी कक्षाद्वारे उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवले जात आहे. पोस्टल बॅलेटसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ९ ते १२ जानेवारीपर्यंत मनपा कार्यालयात सुविधा केंद्र उभारले जाणार आहे. मनपा झोन क्रमांक ३ येथे स्ट्रॉंग रुम ची व्यवस्था केली असून, येथे १६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. १० जानेवारीला सकाळी ८ वाजता महानगरपालिकेच्या बंगाली कॅम्प झोन क्रमांक ३ येथे मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम उपकरणात कुठलेही तांत्रिक बिघाड नसल्याचे प्रात्यक्षिके कपण्यात येणार आहे. १४ जानेवारीला सकाळी ८ वाजतांपासून मतदान अधिकारी , कर्मचाऱ्यांच्या पथकांना मतदान साहित्य, ईव्हीएम उपकरणे आदींचे वाटप करण्यात येणार आहे.

१५ जानेवारीला मतदान संपल्यानंतर सायंकाळी ५.३० वाजेपासून मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पथकांना देण्यात आलेले ईव्हीएम उपकरणे मनपाच्या बंगाली कॅम्प झोन क्रमांक ३ येथे सिल करुन परत 'स्ट्रॉंग रुम' मध्ये जमा करण्यात येणार आहे. १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता निवडणूक प्रचार संपणार आहे. १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. मतमोजणी १६ जानेवारीला होणार असून, मतमोजणीसाठी एकूण १२ टेबल ठेवण्यात येणार असून यातील १० टेबल हे ईव्हीएम द्वारे तर २ टेबल हे पोस्टल बॅलेट मतमोजणीसाठी असणार आहे, अशी माहिती आयुक्त अकुनुरी नरेश यांनी दिली.

## घणसोलीतील २१ शाळांमधील १३ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतली 'मतदार जागरूक दूत' महाप्रतिज्ञा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव हे लक्षात घेत १५ जानेवारी रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने घणसोली परिसरात निवडणूकीच्या 'स्वीप' उपक्रमांतर्गत ६, ८ आणि ९ प्रभागांच्या क्षेत्रातील विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या तब्बल १३ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळांच्या परिसरात एकत्र येत एकाच वेळी सामूहिकरित्या 'मतदार जागरूक दूत' म्हणून प्रतिज्ञा घेतली.

'आम्ही आज जरी मतदार नसलो, तरी मतदार जागरूक दूत म्हणून समाजाला नवी दिशा देऊ' - असा ठाम निश्चय या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिज्ञेतून केला. या चिमुकल्या मतदान जागरूक दूतांनी शपथ घेतली की, ते मतदानाच्या जनजागृतीची आपल्या कुटुंबापासून सुरुवात करून शेजारी आणि नातेवाईकांना मतदानाचे महत्त्व पटवून देतील. कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता प्रत्येकाने मतदान करावे, १००% मतदान व्हावे यासाठी हे विद्यार्थी आता घरोघरी संदेश पोहोचवणार आहेत.

या मतदानाच्या महासंकल्प मोहीमेत घणसोली आणि परिसरातील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.५५ व १०४ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर), शाळा क्र. ७८ गौतम नगर, शाळा क्र.४० व ११३ महापे, शाळा क्र.३९ हनुमान नगर, शाळा क्र.४१ व १२३ अडवली भूतावली, शाळा क्र.३४ व ११५ श्रमिक नगर, शाळा क्र.४४ तळवली, शाळा क्र.४२ घणसोली, शाळा क्र.१०५ घणसोली आणि शाळा क्र.७६ घणसोली या नमुंमपा शाळांतील विद्यार्थी, शिक्षकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

त्यासोबतच शेतकरी शिक्षण संस्था विद्यालय घणसोली, नवी मुंबई सिटी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज घणसोली, टिळक एज्युकेशन सोसायटी ग्लोबल स्कूल घणसोली, राजीव गांधी कॉलेज घणसोली, प्रेरणा हिंदी विद्यालय घणसोली, शारदा हिंदी विद्यालय रबाळे आणि इंदिरा गांधी विद्यालय रबाळे या खाजगी शाळांतील विद्यार्थी, शिक्षकांनीही आपल्या शाळेच्या पटांगणात एकत्र येत आम्ही लोकशाहीचे रक्षक होणार हा ठाम निश्चय व्यक्त केला.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रमांतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, निवडणूक विषयक स्वीप उपक्रमांचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ.अजय गडदे, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या मार्गदर्शनाखाली घणसोली विभागातील शाळांमध्ये हा मतदान महासंकल्प उपक्रम भव्यतम स्वरूपात राबविण्यात आला.

घणसोलीच्या निवडणूक निर्णय अधिकारी कल्पना गोडे, विभाग अधिकारी वसंत मुंडावरे, कार्यकारी अभियंता यशवंत कापसे आणि घणसोली विभागाचे स्वीप कार्यक्रम प्रमुख उपअभियंता संतोष मोरस्कर यांच्या सुयोग्य नियोजनामुळे या मोहिमेला मोठे स्वरूप प्राप्त झाले. स्वीप समन्वयक अधिकारी कमलेश इंगळे यांनी या सर्व शाळांच्या समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. विद्यार्थ्यांनी एकत्र येत मतदानविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याच्या घेतलेल्या प्रतिज्ञेची अंमलबजावणी त्यांचे पालक, कुटुंबीय, शेजारी व परिचित यांच्यामध्ये जनजागृतीसाठी होईल व त्याचा निश्चित लाभ मतदानाची टक्केवारी वाढण्यात होईल असा विश्वास पालक आणि नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## आरोग्य विभागाअंतर्गत अधिकाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती करताना एसएचआरसीच्या मूल्यांकन अहवालानुसार कार्यवाही करावी - आरोग्यमंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, मुंबई :** सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली, पदोन्नती करताना 'राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र' (एसएचआरसी) च्या प्रणालीनुसार कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. केंद्र शासनाची 'राष्ट्रीय आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र (एनएचएसआरसी) नवी दिल्ली' ही संस्था देश पातळीवर आरोग्य विभागास तांत्रिक सहकार्य करते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात 'राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे' ही संस्था कार्यरत आहे. राज्याच्या आरोग्य विभागाची गुणवत्ता वाढ, आरोग्यविषयक संशोधन व तांत्रिक सहकार्य या संस्थेच्या वतीने देण्यात येते. आरोग्य विभागामार्फत एसएचआरसी संस्था राज्यातील सर्व जिल्ह्यातील व महापालिका क्षेत्रातील आरोग्य संस्थांचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजाचे मूल्यांकन करते. तसेच त्यांचे कामगिरीवर आधारित गुणवतेनुसार दरमहा (रँकिंग) गुणानुक्रम देत असते. या रँकिंग प्रणालीमध्ये प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय बाबींचा समावेश असतो. यापुढे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या बदली, बढती करताना, कामगिरीवर आधारित मूल्यांकन (रँकिंग) प्रणालीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री यांनी दिल्या आहेत.

या निर्णयामुळे आरोग्य सेवेचे कामकाज अधिक पारदर्शक होईल. राज्यातील आरोग्य कार्यक्रम राबवण्यासाठी केंद्र व राज्य शासना मार्फत निधी उपलब्ध होत असतो. या निधीबरोबरच नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सबीलिटी (सीएसआर)' माध्यमातूनही निधी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागाने सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

# महाबळेश्वरच्या विकासासाठी नगर विकास विभागकडून ६४.६५ कोटींचा निधी मंजूर

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१०, महाबळेश्वर (सातारा) :** केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य २०२५-२६ या महत्त्वपूर्ण योजनेतून महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेला मोठा निधी प्राप्त झाला आहे. नगर विकास विभागामार्फत शहरातील विविध विकासकामांसाठी एकूण ६४ कोटी ६५ लाख २४ हजार ६१६ रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी दिली.

विकास कामांच्या निधीबाबत नगर परिषदेमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष सुनिल शिंदे, नगरसेवक नासिर मुलाणी, अफझल सुतार, संतोष शिंदे, रविंद्र कुंभारदरे, संजय जंगम, संतोष आखाडे, राहुल पिसाळ, रोहित ढेबे व नगरसेविका विमलताई पार्टे, विद्या बावळेकर, पल्लवी कोंढाळकर, संगीता वाडकर, प्रियंका वायदंडे, रेश्मा ढेबे इत्यादी उपस्थित होते. या मंजूर निधीतून प्रामुख्याने नगरपरिषदेची नवी ओळख



निर्माण करणारी प्रशासकीय इमारत आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. मंजूर झालेली प्रमुख कामे खालीलप्रमाणे आहेत:

**नूतन प्रशासकीय इमारत :-**

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे भव्य बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना सर्व प्रशासकीय सेवा एकाच छताखाली आणि आधुनिक सुविधेत उपलब्ध होतील.

**रस्ते काँक्रीटीकरण (तापोळा रोड ते जुना सातारा रोड) :-**

तापोळा रोडपासून ससून रोड, जन्नीमाता सोसायटी ते जुना सातारा रोडपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येईल. तसेच पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्या कडेला 'पावसाळी गटर' (Storm Water Drain) बांधण्यात येणार आहे. माखरीया हायस्कूल परिसर विकास माखरीया हायस्कूल ते तापोळा रोड नगरपरिषद हद्दीपर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार असून, याच मार्गावर एका पुलाचे बांधकाम ही प्रस्तावित आहे.

**पर्यटन मार्गाचे सक्षमीकरण :** पर्यटकांची वर्दळ असलेल्या क्षेत्र म हाबळेश्वर रोडवरील आर.आर. हेरिटेज रिसॉर्ट कॉर्नर ते ग्लेनगिरी बंगलो ते लॉडविक पॉईंट रोडपर्यंतच्या रस्त्याचे संपूर्ण काँक्रीटीकरण केले जाणार आहे.

पर्यटन आणि स्थानिक सोयींना प्राधान्य महाबळेश्वर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ असल्याने येथील रस्त्यांची स्थिती चांगली असणे आवश्यक आहे. काँक्रीटीकरणामुळे रस्त्यांचे आयुष्य वाढणार असून पावसाळ्यात होणारी दुरवस्था थांबणार आहे. यामुख्याधिकारी योगेश पाटील यांची माहिति दिली विकास कामांच्या प्रशासकीय मान्यतेमुळे शहरवासीयांमध्ये समाधानाचे वातावरण असून, लवकरच या कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. या सर्व कामांसाठी शासनाच्या नगर विकास विभागाने६४ कोटी ६५ लाख २४ हजार ६१६ रुपयांच्या निधी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

यावेळी नगराध्यक्ष श्री.शिंदे म्हणाले, महाबळेश्वर शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या अनुषंगाने अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचे सहकार्याने व प्रशासनाच्या पाठपुरव्याम ुळे हा निधी उपलब्ध झाला आहे. म हाबळेश्वर शहरातील नागरिकांच्या वतीने व सर्व पदाधिकारी यांच्यावतीने आभार व्यक्त करून या निधीमुळे शहराच्या पायाभूत सुविधामध्ये मोठी वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# राजेंद्र भालेराव यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील हिवरे कोरडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सायबर जनजागृतीसह शालेय साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. देश पातळीवर सायबर इंटरनेट सिक्युरिटी क्षेत्रात अग्रगण्य असलेले राजेंद्र भालेराव यांनी या कार्यक्रमात स्वतः आपल्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय साहित्य वाटप केले, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसून आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजेंद्र भालेराव म्हणाले, इंटरनेटचा वापर अभ्यासासाठी करा. सोशल मीडियावर वेळ वाया घालवण्यापेक्षा शिक्षणावर लक्ष केंद्रित करा. शिक्षणामुळेच ज्ञान आणि सुरक्षित भविष्य घडते.

तसेच एका हाताने केलेले चांगले काम दुसऱ्या हाताला कळू नये अशी भावना ठेवून सम ाजसेवा करावी, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास सायबर इंटरनेट सिक्युरिटीचे अधिकारी राजेंद्र भालेराव, चंद्रकांत भालेराव, पत्रकार संतोष कोरडे यांच्यासह बबन अडसूळ, म ल्हारी कोरडे, रोहित बोऱ्हुडे, भानुदास अडसूळ, अंबादास कोरडे, राजू शिंदे, बाळासाहेब कोरडे, बाळासाहेब अडसूळ, शशिकांत अडसूळ, सुखदेव कोरडे, संभाजी आडसूळ,भाऊ अनारसे, बाळासाहेब नरसाळे आदी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शाळेच्या वतीने मुख्याध्यापक झावरे बाबाजी, उपाध्यापिका शिंदे मंगल,



सायबर सिक्युरिटी अधिकारी राजेंद्र भालेराव यांच्याशी संवाद साधताना त्यांनी तालुक्यातील सहकारी बँका, नागरिक सहकारी बँका, पतसंस्था तसेच शैक्षणिक संस्था यांच्यासाठी आपले योगदान देण्याची तयारी दर्शवली. सायबर गुन्हेगारी, ऑनलाइन फसवणूक, डेटा सुरक्षा याबाबत मार्गदर्शन, प्रशिक्षण व नेटवर्किंग सल्ला देण्याचे काम ते करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. कॉलेज, शाळा तसेच आर्थिक संस्थांसाठी सायबर सुरक्षेचे प्रबोधन वर्ग, प्रशिक्षण शिबिरे घेण्याचीही त्यांनी तयारी दर्शवली. यासोबतच त्यांनी यापूर्वी ही प्रस्तावानुसार अनेक शाळांना शालेय साहित्य व दप्तरांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

**- संतोष कोरडे (पत्रकार)**

छाया कराळे, कविता कातोरे, ठाणगे अर्चना अश्विनी जऱ्हाड, नीलिमा कोरडे, रूपाली अनारसे, मनीषा ठोकळ, यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ढवळपुरी (ता.पारनेर) येथील म ूळ रहिवासी असलेले भालेराव बंधू हे गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने मदत करत असून, त्यांच्या या उपक्रमामुळे शिक्षणाला चालना मिळत आहे. या कार्यक्रम ाच्या शेवटी ग्रामस्थांच्या हस्ते राजेंद्र भालेराव यांचा सत्कार करण्यात आला. सायबर सुरक्षेची जनजागृती, शिक्षणाला प्रोत्साहन आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम असलेला हा उपक्रम हिवरे कोरडा परिसरात चर्चेचा विषय ठरला.

# गणेशखिंड देवस्थानच्या विकासासाठी निधी देऊ - दिलीप दाते

## वर्षभरात देवस्थान विकासासाठी ९० लाखांचा भरीव निधी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** नुकतीच अंगारक संकष्ट चतुर्थीच्या पावन पर्वानिमित्त पारनेर तालुक्यातील गणेशखिंड, पुणेवाडी येथील सुप्रसिद्ध मंगळाचा गणपती मंदिरात तालुक्यासह परिसरातील हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मंगळ दोषातून मुक्ती देणारे हे देवस्थान भाविकांमध्ये विशेष श्रद्धास्थान मानले जाते. या दिवशी पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव उद्योजक दिलीप दाते यांनीही मित्र-परिवारासह दर्शन घेतले. यावेळी वृत्तवाहिनीच्या पत्रकारांशी बोलताना दिलीप दाते यांनी सांगितले की, तालुक्यातील इतर नागरिकांप्रमाणे दाते कुटुंबीयांचीही या देवस्थानवर नितांत श्रद्धा आहे. यावेळी बोलताना दिलीप दाते म्हणाले, आमदार काशिनाथ दाते यांनी २०२५ च्या विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर सर्वप्रथम या देवस्थानच्या विकासासाठी ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. तसेच आता देवस्थानला मुख्य रस्त्याशी जोडणाऱ्या रस्त्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून हे काम येत्या १० ते १५ दिवसांत पूर्ण होणार आहे. एकूण ९० लाख रुपयांचा निधी या देवस्थानच्या विकासासाठी देण्यात आला असून भविष्यातही आमदार दाते यांच्या माध्यमातून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात येईल,




असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला. अंगारक संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने तालुकाभरातील भाविकांच्या उपस्थितीत श्रद्धा, दर्शन, उपवास व पूजाविधीमुळे निसर्गाचा अनमोल ठेवा लाभलेला संपूर्ण गणेशखिंड परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले संघर्ष' पुरस्काराने संजय इंगवले सन्मानित

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** सातारा येथील क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती समारोह समितीच्यावतीने सामान्यातील असामान्य या नावाने देण्यात येणाऱ्या 'क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले संघर्ष' पुरस्काराने पाटण तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष तसेच येथील श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयाचे ग्रंथपाल संजय इंगवले यांना सन्मानित करण्यात आले. सातारा येथील दैवज्ञ सांस्कृतिक भवन येथे मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ, महाराष्ट्र, गोवा बार असोसिएशनचे उपाध्यक्ष अँड. उदय वारुंजीकर, सामाजिक कार्यकर्त्या अँड . वर्षा देशपांडे व मान्यवरांच्या उपस्थितीत संजय इंगवले यांना पुरस्कार सम



ारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी अॅड. शैला जाधव, नगर वाचनालयाच्या ग्रंथपाल रुपाली,मुळे, कैलास जाधव, माया पवार आदींसह जिल्ह्यातील महिला संघटनांचे प्रतिनिधी, बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव, अंगणवाडी सेविका, मंदतनीस, आशासेविका तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कारबद्दल संजय इंगवले यांचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, भाजपचे राज्य परिषद सदस्य, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, युवा नेते याज्ञसेन पाटणकर, सामाजिक कार्यकर्ते दीपकसिंह पाटणकर, धैर्यशील पाटणकर, वाचनालयाचे अध्यक्ष डी. के. देशमुख, माजी अध्यक्ष चंद्रहार निकम, कार्यवाह प्रदीप साळवेकर, माजी उपसरपंच चंद्रकांत मोरे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष यशवंतराव जगताप, बळीराम सुर्वे, अनिल भोसले, प्रकाश जाधव, मनोहर यादव, पत्रकार विक्रांत कांबळे, सुरेश संकपाळ, शंकर मोहिते, नितीन खैरमोडे, आदींनी अभिनंदन केले.

# थोडक्यात

## 'बाल आनंद मेळावा'; पत्रकारांचा ही विशेष सन्मान

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१०, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ रोजी चिमुकल्यांचा किलबिलाट आणि खरेदी-विक्रीचा उत्साह पाहायला मिळाला. निमित्त होते बाल आनंद मेळाव्याचे विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, त्यांना प्रत्यक्ष व्यवहाराचे आणि अर्थकारणाचे धडे मिळावेत, या उद्देशाने या आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

सविस्तर असे की, विंचूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात स्काऊट-गाईड उपक्रमांतर्गत हा बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ.सुजित गुंजाळ, कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश जेऊघाले आणि इतर मान्यवरांच्या हस्ते या आनंद बाजाराचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, वस्तू आणि कलाकृतींचे स्टॉल्स लावत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या बाल व्यापाऱ्यांनी ग्राहकांना आकर्षित केले. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, आर्थिक साक्षरता आणि संघभावना वाढीस लागावी, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून पत्रकार दिनानिमि त्त विंचूर परिसरातील पत्रकारांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार किशोर पाटील आणि पत्रकार कादरी यांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेचे महत्त्व समजावून सांगितले. या मेळाव्यास शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार आणि पालकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी साकारलेला हा आनंद मेळावा केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, त्यांना भविष्यातील व्यवहार ज्ञानाचे धडे देणारा ठरला.

## गुन्हेगारांकडून ९ लाख ७५ हजारांचे दागिने जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर परिसरातील घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने रेकॉर्डवरील दोन आरोपींकडून सुमारे ९ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करून मोठे यश मिळविले आहे. दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबिराकडून मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार तनविर कादीर बेग (वय २३), रा.भंगाराम वार्ड, चंद्रपूर व सुजल दिलीप ताकसांडे (वय २३), रा.डॉ.जाकीर हुसेन वार्ड बल्लारपूर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडून अंदाजे ९ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. सदर दागिने हे चंद्रपूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील भिवापूर वार्ड येथील घरफोडीच्या गुन्ह्यातील असल्याचे उघडकीस आले आहे. पुढील तपासासाठी दोन्ही आरोपींना चंद्रपूर शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, सुनिल गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनिकांत पुठ्ठावार, दिपक डोंगरे, इम्रान खान, पोअं हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार यांनी केले.

## आज महसूलमंत्री बावनकुळे चंद्रपुरात; चार जाहीर सभांना करणार संबोधित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे म हसूलमंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते ना. चंद्रशेखर बावनकुळे रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी चंद्रपूर दौऱ्यावर येत असून त्यांच्या दौऱ्यादरम्यान शहरातील विविध भागांमध्ये चार जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांमधून ते महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी थेट मतदारांशी संवाद साधणार आहेत. सकाळी ९.३० वाजता महसूलमंत्री बावनकुळे वेकोलीच्या हेलीपॅडवर आगमन करणार आहेत. त्यानंतर सकाळी १० वाजता तुकुम येथील चवरे ले-आऊट येथे आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करणार आहेत. सकाळी ११ वाजता श्यामनगर येथे दुसरी जाहीर सभा होणार असून दुपारी १२ वाजता बाबूपेठ येथील नेताजी चौकात तिसरी जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. यानंतर दुपारी १ वाजता भिवापूर येथील माता नगर चौकात चौथी जाहीर सभा पार पडणार आहे. या सभांमधून महसूलमंत्री बावनकुळे केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख व लोककल्याणकारी योजनांची माहिती देत महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन करणार आहेत. दरम्यान, दुपारी २ वाजता जोडदेऊळ येथे संत जगनाडे महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून ते अभिवादन करणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे भाजप - शिवसेना - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महायुतीच्या प्रचाराला मोठी गती मिळणार आहे. या सर्व जाहीर सभांना महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरच्या वतीने करण्यात आले आहे.

## सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराकरिता उपमुख्यमंत्री शिंदे ची जाहीर सभा

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१०, मिरा भाईंदर :** मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर शहरात शिवसेना पक्षाच्या अधिकृत ८१ उमेदवारांचा आत्मविश्वास उंचाविण्याकरिता आणि मिरा-भाईंदरच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि जनसामान्यांच्या मनातील प्रगतीचा विचार मांडण्यासाठी महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्वप्नांच्या शहराची सभा रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदान, भाईंदर पूर्व येथे आयोजित करण्यात आली आहे. ही केवळ राजकीय सभा नसून, ही मिरा-भाईंदर शहराला 'स्वप्नांचं शहर' बनविण्यासाठी हक्काच्या विकासाची चर्चा आहे. तरी सर्व पत्रकार, माध्यम प्रतिनिधी आणि त्यांच्या व्हिडीओग्राफर्सनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.